# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक:24.05.2024** **वार :शुक्रवार**

---

**एनडीए दीक्षांत**

लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी आज खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमी- एनडीए च्या 146 व्या तुकडीच्या दीक्षांत संचलनाची पाहणी केली. या दीक्षांत संचलनात एकूण 1 हजार 265 छात्र सहभागी झाले होते. यापैकी अभ्यासक्रमात उत्तीर्ण झालेले 337 छात्र संचलनात सहभागी झाले होते. या दीक्षांत संचलनामध्ये भूतान, ताजिकिस्तान, अफगाणिस्तान, श्रीलंका, म्यानमार आणि मालदीव या भारताशी मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या देशांमधले 19 छात्रही सहभागी झाले होते. या संचलनात 199 लष्कर, 38 नौदल आणि 100 हवाई दल छात्रांचा समावेश होता. सध्या प्रशिक्षणाच्या तिसऱ्या आणि चौथ्या सत्रात असलेल्या 24 महिला छात्रांच्या तुकडीनंही या दीक्षांत संचलनात भाग घेतला.

**FTII**

पुण्याच्या फिल्म्स अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया FTII च्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या चित्रपटाला 77 व्या कान्स चित्रपट महोत्सवात 'सिनेफ' पुरस्काराचं सर्वोच्च पारितोषिक मिळालं आहे. यासाठी जगभरातून आलेल्या 2263 प्रवेशिकांमधून 18 चित्रपटांची निवड करण्यात आली होती. FTII चा विद्यार्थी, चिदानंद नाईक याने दिग्दर्शित केलेल्या "Sunflowers were the first ones to know" या लघुपटाला हे पारितोषिक मिळालं. हा लघुपट कन्नड लोककथेवर आधारित आहे. FTII च्या दूरचित्रवाणी गटाच्या सुरज ठाकूर यांनी या चित्रपटासाठी कॅमेरा संयोजन, मनोज व्ही यांनी संपादन तर ध्वनी संयोजन अभिषेक कदम यांनी केलं.

**अपघात**

कल्याणी नगर अपघात प्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि सहायक पोलिस निरीक्षक अपघात झाल्यावर घटनास्थळी गेले, मात्र त्यांनी ही बाब कंट्रोल रूमला कळवली नाही. त्यामुळे या दोघांवर कारवाई होऊ शकते, असं पोलीस आयुक्त अमितेष कुमार यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. रॅप गीताच्या माध्यमातून फेक व्हिडिओ तयार करणाऱ्या मुलावरही गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात येईल. तसच अपघात घडला तेव्हा पाठीमागे दोन मित्र बसले होते आणि ड्रायव्हर शेजारच्या सीटवर बसला होता. बारमधुन बाहेर पडल्यावर वाहन चालकाने मुलाच्या वडिलांना मुलगा कार चालवण्याच्या स्थितीत नाही हे सांगितलं होतं, मात्र वडिलांनी तरीही 'गाडी चालवायला दे' असं सांगितल्याचं आयुक्त म्हणाले.

**पुणे मिळकत**

पुणे महानगरपालिकेला चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत 632 कोटी रुपयांचं उत्पन्न मिळकतकरातून प्राप्त झालं आहे. त्यात सर्वाधिक 417 कोटींचा मिळकत कर ऑनलाइन पद्धतीनं जमा झाला आहे. 1 एप्रिल ते 31 मे दरम्यान कर भरणाऱ्यांना पाच ते दहा टक्के इतकी सवलत दिली जाते.

**<u>परीक्षा</u>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. येत्या जुलै आणि ऑगस्ट महिन्यात ही पुरवणी परीक्षा होणार असून विद्यार्थ्यांना येत्या सोमवारी 27 मे पासून 7 जून पर्यन्त अर्ज भरता येणार आहेत.

**<u>हजयात्रा</u>**

हज यात्रेसाठी जाणा-या दोन हजार हून आधिक यात्रेकरूंची आरोग्य तपासणी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकाडून करण्यात आली. तपासणीनंतर यात्रेसाठी सक्षम असणा-या यात्रेकरूंना फिटनेस प्रमाणपत्र देण्यात आलं. प्रमाणपत्र मिळाल्यानंतर 1441 यात्रेकरूंचं लणीकरण करण्यात आल्याची माहिती आरोग्य प्रमुख डॉक्टर भगवान पवार यांनी दिली. ज्या यात्रेकरूंचं लसीकरण राहिलं आहे, त्यांनी नारायण पेठेतील मुख्य लसीकरण केंद्रात संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>मैलापाणी</u>**

पुढे शहरात बांधकामांसाठी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांमधून शुद्ध केलेलं पाणी वापरण्याचे आवाहन महानगरपालिकेनं केलं आहे. त्यानुसार 752 बांधकामांपैकी केवळ 8 ठिकाणी असं पाणी वापरलं जात असल्याचं समोर आलं आहे.

**<u>निवड</u>**

पुणे पत्रकार प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी दैनिक 'आज का आनंद'चे मुख्य बातमीदार शैलेश काळे यांची तर खजिनदारपदी टाइम्स ऑफ इंडियाचे वरिष्ठ बातमीदार प्रसाद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. तसंच विश्वस्तपदी चंद्रकांत हांचाटे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

**<u>मानसिक आजार</u>**

स्किझोफ्रेनिया हा आजार असलेल्या रुग्णांवर औषधोपचार करणे, पालक आणि नातेवाईकांचं समुपदेशन करणे गरजेचं आहे, यासाठी आपण सर्वांनी मदतीचा हात देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असं आवाहन मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमर शिंदे यांनी केलं आहे. मांजरी इथल्या जागृती पुनर्वसन केंद्रात स्किझोफ्रेनिक रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांनी घेतलेल्या पुढाकारातून स्किझोफ्रेनिया आणि अन्य मानसिक आजारांबाबत विशेष मेळावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 38 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 26 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. संध्याकाळ नंतर पाऊस पडण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**